हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिंदुराष्ट्रम् ।।

दिनांक : २४ मार्च २०१५

प्रति,

संपादक महोदय/प्रमुख प्रतिनिधी

**कृपया प्रसिद्धीसाठी !**

**हिंदु जनजागृती समितीची मुख्यमंत्री आणि केंद्रीय परिनिरीक्षण मंडळाकडे मागणी**

**नैतिकता आणि भारतीय संस्कृतीचा ऱ्हास करणाऱ्या 'एम्एम्एस्' कोकणी चित्रपटावर बंदी घाला !**

पणजी, २४ मार्च – नैतिकता आणि भारतीय संस्कृतीचा ऱ्हास करणाऱ्या 'एम्एम्एस्' कोकणी चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी हिंदु जनजागृती समितीने गोवा राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय परिनिरीक्षण मंडळाकडे २४ मार्च या दिवशी एका निवेदनाद्वारे केली आहे. 'एम्एम्एस्' हा कोकणी चित्रपट १० एप्रिल या दिवशी प्रदर्शित होत आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, चित्रपटाच्या 'ट्रेलर'मध्ये अल्पवयीन मुले आणि मुली एकमेकांचे चुंबन घेतांना अन् अनैतिक संबंध ठेवतांना दाखवले आहे. यासंबंधीची चित्रे इतर मित्रांना पाठवण्यात आल्याने अनैतिक संबंध ठेवणारी मुलगी आत्महत्या करते. या चित्रपटाद्वारे अनैतिक संबंध ठेवणे, हा युवकांचा हक्क असल्याचे दाखवले आहे. युवती शारीरिक सुख घेण्याचे एक साधन आहे. अल्पवयीन युवा आणि युवतींना लैंगिक संबंध ठेवणे सोपे आहे, असा चुकीचा आणि धोकादायक संदेश चित्रपटाद्वारे युवा पिढीपुढे जात आहे. हा चित्रपट भारतीय संस्कृती आणि भारतातील कुटुंबव्यवस्था यांच्या विरोधात असून, युवायुवतींनी अनैतिक संबंध ठेवणे मान्य असलेल्या पाश्चात्य संस्कृतीला प्रोत्साहन देणारा आहे. गोव्याचे नाव मद्य, महिला, अमली पदार्थ आणि कॅसिनो यांमुळे अगोदरच अपकीर्त झालेले असून, या चित्रपटामुळे गोव्याचे नाव अजूनही अपकीर्त होणार आहे.

आपला विश्वासू,

डॉ. मनोज सोलंकी,
राज्य समन्वयक, हिंदु जनजागृती समिती
संपर्क क्र. – ९३२६१०३२७८